# मराठी न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# उपयोगकर्ता शुल्क वसुली बंद!

## मळकतधारकांना लावलेल्या उपयोगकर्ता शुल्काला राज्य सरकारने दिली स्थगिती

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** मिळकत धारकांना लावलेल्या उपयोगकर्ता शुल्काला राज्य सरकारने स्थगिती दिली आहे. त्यानंतर, कर संकलन व आकारणी विभागाने मिळकतकर बिलाच्या संगणक प्रणालीत बदल केला आहे. त्यानंतर आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी शासन आदेशाची अंमलबजावणी करावी, अशा सूचना कर संकलन व कर आकारणी विभागाला दिल्या होत्या.

यानंतर कर संकलन व कर आकारणी विभागाने संगणक प्रणालीत बदल केला आहे. त्यानुसार २६ डिसेंबरपासून नागरिकांच्या ऑनलाईन बिलात उपयोग




कर्ता शुल्क स्थगिती आदेशाची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे मालमत्ता धारकांनी थकीत आणि चालू कर भरून महापालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले आहे. त्यामुळे, मिळकत धारकांना उपयोगकर्ता शुल्क न भरता आपला मूळ मिळकत कर भरता येणार आहे. उपयोगकर्ता शुल्काची आकारणी आरोग्य विभागाने केली होती. मात्र, त्याची वसुली मिळकतकर विभागामार्फत केली जात होती. त्यास नगर विकास विभागाने तात्पुरती स्थगिती देत मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक होईपर्यंत शुल्क वसुली न करण्याचा आदेश महापालिकेला दिला होता. त्यानंतर, आरोग्य विभागाचे सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे यांनी सरकारच्या आदेशाची अंमलबजावणी करावी, अशी सूचना कर संकलन व आकारणी विभागाला केली होती. त्यानुसार, कर संकलन व कर आकारणी विभागाने संगणक प्रणालीत बदल केला असून २६ डिसेंबरपासून नागरिकांच्या

> “राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने दिलेल्या आदेशानुसार उपयोग कर्ता शुल्क वसुल करण्यास स्थगिती दिली आहे. त्यानुसार कर संकलन व कर आकारणी विभागाच्या संगणक प्रणालीत बदल करण्यात आला आहे.
>
> – शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक.

ऑनलाइन बिलात उपयोगकर्ता शुल्क स्थगिती आदेशाची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे, मिळकतधारकांना आता केवळ थकीत आणि चालू मिळकतकरच भरावा लागणार आहे, अशी माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली. उपयोगकर्ता शुल्क वसूल करण्यास राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने तात्पुरती स्थगिती देत मुख्यमंत्र्यांसमवेत त्यासंदर्भात बैठक होईपर्यंत शुल्क वसुली न करण्याचे आदेश महापालिकेस (दि.२०) डिसेंबर रोजी दिले. उपयोगकर्ता शुल्काची आकारणी आरोग्य विभागाने केली होती. मात्र, त्याची वसुली मिळकतकर विभागामार्फत केली जात होती. त्यास नगर विकास विभागाने तात्पुरती स्थगिती देत मुख्यमंत्र्यांसमवेत बैठक होईपर्यंत शुल्क वसुली न करण्याचा आदेश महापालिकेला दिला होता.

# रावेत येथे महापालिका स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारणार

## स्वतंत्र अग्निशमन केंद्रास ३० कोटींच्या खर्चाची मान्यता

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने रावेत येथे नवीन अग्निशमन केंद्र उभारण्यात येणार आहे. आगीच्या घटनांवर तात्काळ नियंत्रण मिळविण्यासाठी शहरभरात केंद्र उभारण्याचे महापालिकेचे नियोजन आहे. रावेत केंद्रासाठी ३० कोटींचा खर्च करण्यात येणार आहे. त्याला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सर्वसाधारण सभेची प्रशासकीय मान्यता दिली आहे. शहराची लोकसंख्या ३० लाखांवर गेली आहे. उद्योग, व्यवसाय व नोकरीसाठी नागरिकांचा पिंपरी-चिंचवड शहराकडे ओढा असल्यामुळे शहराच्या चारी बाजूस लोकवस्ती वाढत आहे. लोकसंख्या वाढत असल्याने शहराची



लोकसंख्या फुगत आहे. त्यामुळे शहरात विविध ठिकाणी १८ अग्निशमन केंद्रांची गरज आहे. सध्या केवळ ८ केंद्र सुरू आहेत. आणखी दहा केंद्र उभारण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. रावेत भागात घडणाऱ्या आगीच्या घटनांवर नियंत्रण मिळवण्यासाठी निगडी, रहाटणी अग्निशमन केंद्रांवर अवलंबून रहावे लागते. रावेत येथील सर्व्हे क्रमांक ९६ येथील जलशुद्धीकरण केंद्राचे आरक्षण असलेल्या जागेतील १ एकर जागेत स्वतंत्र अग्निशमन केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. बांधकाम, आरसीसी वर्क, प्लोरिंग वर्क, दरवाजे व खिडक्या बसविणे, आतील व बाहेरील प्लास्टर व रंगकाम, अंतर्गत रस्ते, अंतर्गत पावसाळी पाण्याची नलिका, अंतर्गत पाणीपुरवठा व ड्रेनेजवाहिनी, विद्युतीकरण, अग्निशमन व्यवस्था आदी कामासाठी सुमारे ३० कोटींचा खर्च अपेक्षित आहे. त्या खर्चास आयुक्त सिंह यांनी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

# शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनात नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर द्या!

## महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या सूचना

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** शंभरावे अखिल भारतीय नाट्य संमेलन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयातून काम करावे आणि आवश्यक त्या सोयी सुविधांची पुर्तता करावी. तसेच संमेलनात नागरिकांचा सहभाग वाढविण्यावर भर द्यावा, अशा सूचना आयुक्त शेखर सिंह यांनी दिल्या. पिंपरी चिंचवड शहरात होणाऱ्या शंभराव्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या सोयी सुविधांबाबत आढावा बैठक आज महापालिकेच्या पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत पार पडली,



त्यावेळी आयुक्त सिंह बोलत होते. या बैठकीस अखिल भारतीय नाट्य परिषद पिंपरी चिंचवड शाखेचे अध्यक्ष भाऊसाहेब भोईर, शहर अभियंता मकरंद निकम, सह शहर अभियंता डॉ. ज्ञानदेव जुंधारे, बाबासाहेब गलबले, उप आयुक्त मनोज लोणकर, मिनीनाथ दंडवते, निलेश भदाणे, सहाय्यक आयुक्त यशवंत डांगे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे, अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद संयोजन समितीचे सुहास जोशी, संतोष पाटील, प्रणव जोशी, राजेंद्र भंग, मनोज डाळींबकर आदी उपस्थित होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी चिंचवड कलारंग प्रतिष्ठान आणि डॉ. पी. डी. पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने शंभरावे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन दि. ६ व ७ जानेवारी २०२४ या कालावधीत पिंपरी चिंचवड शहरात रंगणार आहे. या काळात महापालिकेच्या काही सभागृहांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून संमेलनात उपस्थित रसिक तसेच कलाकारांसाठी योग्य त्या सोयी सुविधांची उपलब्धता करून देण्यात येणार आहे. या संमेलनाचा उद्घाटन सोहळा ज्या ठिकाणी पार पडणार आहे त्या ठिकाणी देखील आवश्यक सोयी सुविधा महापालिका पुरविणार आहे. या सर्व कामकाजाचा आढावा आणि नियोजनाबाबत आयुक्त शेखर सिंह यांनी माहिती घेतली. अखिल भारतीय नाट्य परीषदेच्या पदाधिकाऱ्यांसमवेत समन्वयाने जबाबदारी पार पाडावी, असे आयुक्त शेखर सिंह यावेळी म्हणाले. तसेच हे नाट्य संमेलन शहराच्या सांस्कृतिक जडणघडणीमध्ये भर घालणारे असून हा सोहळा संस्मरणीय राहण्यासाठी सर्वांनी झोकून देऊन काम करावे, असेही आयुक्त सिंह यावेळी म्हणाले. नाट्य परिषदेच्या प्रतिनिधींनी विविध कामकाजाबाबत रूपरेषा आणि माहिती दिली. महापालिकेकडून पुरविण्यात येणाऱ्या सेवा सुविधा उपलब्ध करून देत असताना नाट्य परिषदेचे प्रतिनिधी देखील कामकाजनिहाय संबंधित विभागांशी समन्वय ठेवतील, असे भाऊसाहेब भोईर यावेळी म्हणाले.

# पिंपळे सौदागरमधील जागेवर बहुउद्देशीय मैदान विकसित करा

## शत्रुघ्न काटे यांचे महापालिका आयुक्तांना निवेदन

**पिंपरी-चिंचवड न्यूज एक्सप्रेस मराठी।** पिंपळे सौदागर प्रभागातील बहुउद्देशीय मैदान विकसित करावे अशी मागणी माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात शत्रुघ्न काटे यांनी म्हटले आहे की, पी.के. चौक ते गोविंद यशदा चौक दरम्यान असलेली कचढठची मोकळी जागा विकसित करावे. प्रभाग क्र.२८ रहाटणी पिंपळे सौदागरमध्ये असलेल्या कचढठ जागेत कोकणे चौक ते स्वराज चौक दरम्यान २ किमी लांब असे शिव छत्रपती लिनिअर अर्बन गार्डन तसेच विविध प्लाझा विकसित करण्यात आले आहे. याच शिव छत्रपती लिनिअर अर्बन गार्डन दरम्यान असलेल्या पी.के. चौक ते गोविंद यशदा चौक दरम्यान ४६३ मी.लांब असलेल्या क्षेत्रापैकी ९५ टक्के जागा ताब्यात असूनही अद्याप विकसित करण्यात आलेली नाही.



स्मार्ट सिटी अंतर्गत सदर जागेत आपण इचद पार्क विकसित करणार होतो. परंतु या इचद पार्कचा फारसा वापर या प्रभागात होणार नसल्याचे दिसून आले. शहरात इतर दुसऱ्या ठिकाणी आपण इचद पार्क विकसित करण्याचा विचार करू शकतो. सदर जागा समतल प्रकारची असून याचा संपूर्ण उपयोग बहुउद्देशीय मैदान विकसित करण्यासाठी केल्यास नागरिकांना याचा नक्कीच फायदा होईल असे मत शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केले आहे. पिंपळे सौदागर परिसरात दिवसेंदिवस वाढत असलेली नागरी लोकवस्तीचा विचार करता, नागरीकांच्या सुविधेच्या उपाययोजना करणे क्रमप्राप्त ठरते. अश्या परिस्थितीत सदर जागेचा उपयोग आपण बहुउद्देशीय टर्फचे मैदान किंवा ट्रीमिक्स पद्धतीने मैदाने विकसित करण्यासाठी करू शकतो. जेणेकरून याचा लाभ परिसरातील नागरिकांना घेता येईल. यासाठी विविध सुखसुविधा असलेली बहुउद्देशीय मैदान विकसित करण्यासाठी एका चांगल्या आर्किटेक्टची नेमणूक करण्यात यावी. सदर जागेचा पूर्ण नियोजनबद्ध आराखडा तयार करून एक बहुउद्देशीय मैदान नागरिकांसाठी विकसित करता येईल. पी.के. चौक ते गोविंद यशदा चौक दरम्यान असलेली कचढठ च्या मोकळ्या जागेत बहुउद्देशीय मैदान विकसित करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात अशी मागणी माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी महापालिका आयुक्तांच्याकडे केली आहे.

# दीड लाख मतदारांचे चेहरे एकसारखे

## खोट्या कागदपत्राच्या आधारे मतदारकार्ड काढण्याचा प्रयत्न



**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
निवडणूक आयोगाने विविध माध्यमांतून मतदार यादी शुद्धीकरणासाठी कार्यवाही सुरू केलेली आहे. त्यात पुणे जिल्ह्यात दुबार नाव नोंदणीचे २८ हजार, तर समान छायाचित्रांचे १ लाख ४२ हजार ३४९ मतदार आढळले असून, निवडणूक आयोगाने एकापेक्षा अधिक ठिकाणी समान छायाचित्र, एकापेक्षा जास्त ठिकाणी मतदारांच्या इतर माहितीमध्ये साधर्म्य आढळलेल्या किंवा दुबार नाव नोंदणी आढळलेल्या मतदारांना 'नमूना अ'मध्ये नोटीस पाठविल्या आहेत. भारतीय लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० च्या कलम १७ व १८ नुसार एका मतदाराची मतदार यादीमध्ये एकच नोंद असणे, निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी मतदार यादी त्रुटीरहीत असणे आवश्यक आहे. मात्र, काही मतदारांचे नाव एकापेक्षा जास्त ठिकाणी नोंद असल्याचे आढळले आहे. त्यामुळे संबंधित मतदारांना दुरुस्ती करण्याबाबत नोटीस बजावण्यात आली आहे. नोटिशीवरील पर्याय निवडून १ जानेवारी २०२४ पर्यंत दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. राजेश देशमुख यांनी केले आहे. या नोटिशीद्वारे कोणत्या एका ठिकाणी नाव अपेक्षित आहे, हे ठरविण्याचा अधिकार मतदाराला दिला आहे. संबंधित मतदाराने ज्या ठिकाणी त्याचे नाव असणे त्यांना स्वतःला अभिप्रेत आहे त्या ठिकाणी बरोबरची खूण करावी आणि दिलेल्या ईमेल पत्त्यावर आधारकार्डच्या छायाप्रतीसह अपलोड करावे किंवा संबंधित मतदार केंद्रस्तरीय अधिकारी यांची भेट घेवून त्यांच्यामार्फत पुष्टीकरण पत्रावर कार्यवाही करणे आवश्यक आहे. या मोहिमेनंतर दोन ठिकाणी मतदाराचे नाव आढळल्यास निवडणूक आयोगाच्या सुचनेप्रमाणे त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असेही देशमुख यांनी स्पष्ट केले. मुळशी तहसील कार्यालयाअंतर्गत खोट्या कागदपत्राच्याआधारे मतदार नोंदणी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पौड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशा प्रकारच्या घटना आपल्या परिसरात घडत असल्याचे निदर्शनास आल्यास नजीकच्या तहसील किंवा तलाठी कार्यालय, पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन मतदार नोंदणी अधिकाऱ्याने केली आहे. तसेच तहसीलदार तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी रणजीत भोसले यांनी केले आहे. मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत २०३ भोर मतदार संघ ता. मुळशी येथील पिरंगुट व यादी भाग क्र. २०४ मुकाईवाडी येथे मतदार नोंदणीसाठी ऑनलाईन पद्धतीने मोठ्या प्रमाणात अर्ज क्र.६ दाखल करण्यात आले. या अर्जासोबत रहिवासी पुरावा म्हणून विद्युत देयक जोडण्यात आले होते.

याबाबत शंका आल्याने महावितरणच्या संकेतस्थळावर पडताळणी केली, असता विद्युत देयकांवरील नाव व पत्त्यात तफावत असल्याचे आढळून आले. याप्रकरणी खोटे विद्युत देयक रहिवासी पुरावा म्हणून सादर केल्याबद्दल विजय मारणे, अमित शिंदे, भाऊसाहेब मोकर, शकील अहमद व महंमद आलम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मतदार याद्यांच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत मतदार यादी अंतिम प्रसिद्धी ५ जानेवारी ऐवजी २२ जानेवारी २०२४ रोजी होणार असून त्यासाठीचा सुधारित कार्यक्रम भारत निवडणूक आयोगाने घोषित केला आहे. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाअंतर्गत मोठ्या प्रमाणात छायाचित्र समान नोंदी, भौगोलिकदृष्ट्या समान नोंदी घेणे आणि अर्ज प्रलंबित असल्याने भारत निवडणूक आयोगाने कार्यक्रमात सुधारणा करण्यात आली आहे. पुनरीक्षण उपक्रमाअंतर्गत दावे व हरकती निकाली काढण्याच्या सध्याची तारीख २६ डिसेंबर २०२३ ऐवजी १२ जानेवारी २०२४ करण्यात आली आहे. मतदार यादीचे मानांकन तपासणे, अंतिम प्रसिद्धीसाठी आयोगाची परवानगी घेणे, अभिलेख अद्ययावत करणे व पुरवणी याद्यांची छपाई करण्याची तारीख १ जानेवारी २०२४ ऐवजी १७ जानेवारी २०२४ करण्यात आली आहे. मतदार यादी अंतिम प्रसिद्धी ५ जानेवारी ऐवजी २२ जानेवारी २०२४ रोजी होईल, अशी माहिती उप जिल्हाधिकारी मिनल कळसकर यांनी दिली आहे.

# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे महाराष्ट्रात दौरे का वाढले ?

## मविआच्या बाजूनं कौल आणि त्यामुळे दौरे वाढले : अमोल कोल्हे

**पुणे।**
**न्यूज एक्स्प्रेस मराठी।**
पंतप्रधान नरेंद्र मोदी लवकरच नाशिक दौऱ्यावर येणार आहेत. मागील काही दिवसांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महाराष्ट्रातील दौऱ्यात मोठी वाढ झाली. याबाबत अमोल कोल्हे यांनी तिखट शब्दात प्रतिक्रिया दिली. सातत्याने जे सर्व्हे आलेत त्यात मविआच्या बाजूनं कौल आणि पारडं जड दिसतोय. त्यामुळे पंतप्रधानांचे दौरे वाढले असावेत, असा टोला अमोल कोल्हेंनी लगावला. ते शेतकरी आक्रोश मोर्चामध्ये बोलत होते. पंतप्रधानांचे एखाद्या राज्यात दौरे वाढले की त्या राज्यांच्या निवडणुका लागल्या, असं म्हटलं जातं. तूर्तास राज्यातील सरकार सक्षम आहे, असं ते म्हणतात. त्यामुळं तूर्तास तरी निवडणुका लागणार नाहीत, असं चित्र आहे. उत्तर प्रदेशनंतर महाराष्ट्रात सर्वाधिक खासदार आहेत. परंतु सातत्याने जे सर्व्हे आलेत त्यात मविआच्या बाजूनं कौल आणि पारडं जड दिसतोय. त्यामुळे पंतप्रधानांचे दौरे वाढले असावेत, असा टोला अमोल कोल्हेंनी लगावला. पंतप्रधान हे संसदेत फारसे दिसले नाहीत. संसदेत आम्ही बोलतो तेंव्हा ते तोंड बंद करतात. मात्र एवढे शेतकरी मंत्री जर या मोर्चाची दखल घेत असतील तर त्यांनीच शेतकऱ्यांचे हे त्यांनी दिल्ली दरबारी ठामपणे मांडावेत, असे कोल्हे म्हणाले. आकडेवारी ही सांगत राहणं, याची महाराष्ट्राला सवय झालेली आहे. खरोखर नेमके किती रोजगार निर्माण होतात, यावर ते अवलंबून आहे. कारण भाजप जेंव्हा इतक्या विश्वासाने सांगतं, तेंव्हा काही दिवसांनी ते म्हणतात ''ये तो जुमला था.'' असा टोला कोल्हेंनी लगावला. गडकरी साहेबांबाबत देशातील प्रत्येकाला नितांत आदर आहे. संसदेत जेंव्हा ही ते बोलतात, तेंव्हा गेल्या साडे चार वर्षात त्यांच्यावर एकाने ही आरोप केलेलं पाहिलं नाही. गडकरी साहेब हे सर्वसमावेशक काम करतात, म्हणून त्यांची बात ही अलग है. या भेटी राजकारणातील सुसंस्कृतता सिद्ध करते, राजकारणात कोणी कोणाचं वैर नसतो. त्यामुळं ही सुसंस्कृतता जपली गेली पाहिजे, असे कोल्हे म्हणाले. काहीवेळा एक मंत्री म्हणाले सेलिब्रिटी आहे असं म्हणतात त्यांचं काही राजकारणात चालत नाही, असं म्हणतात. मी शेतकऱ्यांचा पोरगा आहे, शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत बोलणारच. आता राजकारणात राहून अभिनय करण्यापेक्षा अभिनय करताना राजकारण करणं बरं. किमान सच्चाई आणि सच्चेपना शेतकऱ्यांसह मातीशी इमान राखण महत्वाचं आहे. माझी हीच विनंती आहे, की टीका टिप्पणी करण्यापेक्षा हा प्रश्न शेतकऱ्यांचा आहे हे लक्षात ठेवा, असे कोल्हे म्हणाले. हसन मुश्रीफ यांच्याशी माझं बोलणं झालेलं नाही.

# राज्य सरकारने पुन्हा एकदा केली टास्क फोर्सची स्थापना!

## तज्ज्ञांची पूर्वसंमती न घेता टास्क फोर्स स्थापना



> “राज्य सरकारने आधी स्थापन केलेल्या कोविड टास्क फोर्समध्ये माझा समावेश होता. यावेळी टास्क फोर्समधील समावेशाबाबत सरकारकडून कोणतीही विचारणा झाली नाही. टास्क फोर्समध्ये समावेश झाल्याची बाब माध्यमांमधूनच निदर्शनास आली.
>
> – डॉ.वर्षा पोतदार,
> वरिष्ठ शास्त्रज्ञ, राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्था

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

करोनाच्या पहिल्या लाटेदरम्यान राज्यात तज्ज्ञ डॉक्टरांच्या विशेष कार्यदलाची (टास्क फोर्स) स्थापना करण्यात आली होती. आता राज्य सरकारने पुन्हा एकदा टास्क फोर्सची स्थापना केली आहे. मात्र, हा निर्णय वादग्रस्त ठरला आहे. तज्ज्ञांची पूर्वसंमती न घेता त्यांचा या टास्क फोर्समध्ये समावेश करण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे. याचबरोबर या सदस्यांच्या नावातही चुका करण्यात आल्याने सरकार याकडे किती गांभीर्याने पाहते, असा प्रश्नही उपस्थित झाला आहे. करोनाच्या पहिल्या लाटेत १३ एप्रिल २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात तज्ज्ञ डॉक्टरांच्या विशेष कार्यदलाची (टास्क फोर्स) स्थापना करण्यात आली होती. राज्यात पुन्हा एकदा करोनाची रुग्णसंख्या वाढत आहे. तसेच करोना विषाणूचा जेएन. १ या उपप्रकाराचे रुग्ण वाढत आहेत. त्यानुसार टास्क फोर्सची पुनर्रचना करून नवीन टास्क फोर्सची स्थापना करण्यात आल्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत यांनी जाहीर केले होते. या टास्क फोर्समध्ये अध्यक्षस्थानी भारतीय वैद्यकीय संशोधन परिषदेचे (आयसीएमआर) माजी प्रमुख डॉ. रमण गंगाखेडकर आहेत. तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या (नाशिक) कुलगुरू लेफ्ट. जनरल डॉ. माधुरी कानिटकर, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे संचालक, बी.जे. वैद्यकीय महाविद्यालय (पुणे) येथील डॉ. राजेश कार्यकर्ते, राष्ट्रीय विषाणूविज्ञान संस्थेतील डॉ. वर्षा पोतदार आणि नवले वैद्यकीय महाविद्यालय (पुणे) येथील डॉ. डी. बी. कदम सदस्य आहेत, तर आरोग्य सेवा आयुक्त सदस्य सचिव असणार आहेत. याबाबतचा शासन निर्णयही काढण्यात आला आहे. यातील तज्ज्ञ सदस्यांना राज्य सरकारने या टास्क फोर्सबाबत काहीच कळविले नसल्याच्या बाबीवर आता अनेक सदस्यांनी बोट ठेवले आहे. सरकारने आधी संपर्क साधला नसल्याला जनुकीय क्रमनिर्धारणचे राज्य समन्वयक डॉ. राजेश कार्यकर्ते यांनी दुजोरा दिला. त्यावेळी त्यांनी याबाबत आधी विचारणा झाली नसल्याची कबुली दिली. याचबरोबर त्यांचे नाव राजेशऐवजी सुरेश करण्यात आले होते. टास्क फोर्सची स्थापना मंगळवारी झाल्यानंतर अखेर बुधवारी सायंकाळी सार्वजनिक आरोग्य विभागाने डॉ. कार्यकर्ते यांच्या नावात योग्य सुधारणा केली. तज्ज्ञांची पूर्वसंमती न घेता त्यांचा या टास्क फोर्समध्ये समावेश करण्यात आल्याची बाब उघडकीस आली आहे. याचबरोबर या सदस्यांच्या नावातही चुका करण्यात आल्याने सरकार याकडे किती गांभीर्याने पाहते, असा प्रश्नही उपस्थित झाला आहे. करोनाच्या पहिल्या लाटेत १३ एप्रिल २०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यात तज्ज्ञ डॉक्टरांच्या विशेष कार्यदलाची (टास्क फोर्स) स्थापना करण्यात आली होती. राज्यात पुन्हा एकदा करोनाची रुग्णसंख्या वाढत आहे. तसेच करोना विषाणूचा जेएन. १ या उपप्रकाराचे रुग्ण वाढत आहेत.

# अतिरिक्त आयुक्त पदाच्या बढतीचा निर्णय गुलदस्त्यात

## पदावर कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता कायम

**पुणे ।**
**न्यूज एक्सप्रेस मराठी।**

पुणे महापालिकेच्या सेवेतील अधिकाऱ्यास अतिरिक्त आयुक्तपदी बढती देण्यासाठी राज्य शासनाच्या नगर विकास विभागाने आयोजित केलेली विभागीय पदोन्नती समितीची (डीपीसी) बैठक निर्णयाविना पार पडली. कोणत्या अधिकाऱ्याला पदोन्नती दिली जाईल याचा निर्णय तांत्रिक कारण देत गुलदस्त्यातच ठेवला आहे. त्यामुळे या पदावर कोणाची वर्णी लागणार याची उत्सुकता कायम आहे. नगर विकास'चे प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक झाली. यावेळी पुणे महापालिका व पिंपरी चिंचवडचे महापालिका आयुक्त, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, उपसचिव,




अवर सचिव यावेळी उपस्थित होते. महापालिकेत अतिरिक्त आयुक्त पदाच्या एकूण तीन जागा आहेत. त्यापैकी एका जागेवर महापालिकेतील अधिकाऱ्याची नियुक्ती होऊ शकते. यामध्ये सध्या शहर अभियंता प्रशांत वाघमारे, मुख्य अभियंता श्रीनिवास कंदुल आणि सह आयुक्त उल्का कळसकर हे तिन्ही अधिकारी पात्र आहेत. तसा अहवाल नगरविकास विभागाला देण्यात आला आहेत. या तीन अधिकाऱ्यांपैकी प्रशांत वाघमारे यांना नावाला प्राधान्य देण्यात आले आहे, पण वाघमारे या पदासाठी फारसे इच्छुक नसल्याची चर्चा महापालिकेत आहे. यासंदर्भात त्यांच्याशी खातरजमा करण्यासाठी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण संपर्क होऊ शकलेला नाही. तर श्रीनिवास कंदुल हे पाच महिन्यांनी सेवानिवृत्त होणार आहेत. तर उल्का कळसकर यांची सेवा सुमारे सात वर्ष शिल्लक आहे. हे तिन्ही अधिकारी या पदासाठी पात्र असले तरी अतिरिक्त आयुक्त म्हणून नियुक्त करण्यासाठी तरतुदींमध्ये आणखी स्पष्टता असणे आवश्यक यावर डीपीसीमध्ये एकमत झाले आहे.